**आशीर्वाद**

- कौस्तुभ चाटे

आज पण पाऊस काही थांबायचं नाव घेत नव्हता. आजचा सलग तिसरा दिवस होता. पावसाची संततधार सुरूच होती. अधूनमधून काही वेळासाठी पावसाची उघडीप व्हायची खरी, पण ती फक्त नावापुरतीच. नदीला आणि तिला येऊन मिळणाऱ्या प्रत्येक ओढ्याला पूर आला होता. सगळीकडेच पाणी साठलं होतं. शहरात सगळीकडे पाणी पसरलं होतं . शहरातल्या बिल्डींग्स पाण्यात होत्या, तर मग झोपडपट्ट्यांची काय कथा. तिथले बहुतेक संसार रस्त्यावर आले होते. जे अजून तग धरून होते ते पण एक दोन दिवसात रस्त्यावर येणार होते हे नक्की. एकूणच सगळीकडे भीषण परिस्थिती होती.

संध्याकाळच्या वेळेला शिरप्या काम संपवून घराकडे निघाला होता. आज मालकानी जरा लवकरच गॅरेज बंद केलं होतं. तसंही गेले दोन दिवस गॅरेज मध्ये गर्दी अशी नव्हतीच. शिरप्या निघाला खरा पण आता काय करायचं हा प्रश्न होताच. पाऊस थांबायचं नाव घेत नव्हता आणि घरी जाऊन शिरप्याला सासू सासऱ्याची बडबड ऐकायची नव्हती. गेले काही महिने ते दोघं आणि त्याचा मेहुणा त्याच्याकडेच राहायला आले होते. पण त्याचं सासरच्या मंडळींशी अजिबात जमत नव्हतं . सगळेच एक नंबर बाराचे आहेत असं त्याचं प्रामाणिक मत होतं. पण बायको समोर त्याचं काही चालायचं नाही. तसा त्याचा बायकोवर - रखमावर जीव होता, पण कधी कधी ती फारच विचित्र वागायची. त्यातच तिनी आई वडिलांना आणि भावाला इथे आणून ठेवलेलं, शेजारच्या झोपडीत. पण तिघेही दिवसभर शिरप्याच्या घरीच असायचे. त्यांची जेवणं खाणी एकत्रच व्हायची, फक्त झोपायला काय ते आपल्या घरी जायचे. तिघेही नुसते बसून होते. शिरप्याचा मेहुणा - राजा, पण घरीच असायचा. कोणतंही काम करायचा त्याला जाम कंटाळा. शिरप्यानीच खटपट करून त्याला २-३ कामं मिळवून दिली होती, पण राजाला काम करायचंच नव्हतं. आता शिरप्यानी पण नाद सोडून दिला होता. सासरचे सगळेच त्याच्या उरावर बसून नुसते खायला आले आहेत असं त्याला वाटत होतं. ह्या विषयावर अनेकदा त्याचा रखमा बरोबर वाद झाला होता पण तिच्यापुढे त्याचं फारसं चालत नव्हतं.

घरी जाण्याशिवाय काही पर्याय पण नव्हता. कोणा मित्राकडे जाणं पण शक्य नव्हतं. शेवटी दोन शिव्या हासडून शिरप्या घराकडे निघाला. जाता जाता नेहेमीच्या दुकानातून त्याने चपटी विकत घेतली. शेजारच्या दुकानातून खारे दाणे आणि चिवडा घेऊन घराची वाट पकडली. घरी गेल्यावर रखमाला अंडी उकडायला सांगायची आणि विकत घेतलेली मोसंबी संपवून पाऊस बघत बघत झोपायचं असा विचार करतंच तो झपाझप पावलं टाकायला लागला. पाऊस आत्ता थोडा कमी झाला होता.

"रखमे, जरा वाईच चार अंडी उकडून दे." घरात शिरल्या शिरल्या शिरप्यानी ऑर्डर दिली.

"जरा दम धरा थोडा टाईम, बा ला लापशी करून देते. लै वेळ झाला मागतोय त्यो."

"त्याच्या आयची" शिरप्यानी खाटेवर बसत बसतच शिवी हासडली आणि बाटली उघडून, पेल्यात ओतून कार्यक्रम पण सुरु केला. इकडे त्याच्या सासूची कायतरी बडबड सुरु होतीच. शिरप्याला त्यात घंटा काही रस नव्हता. ती बोलत होती, आणि शिरप्या ह्या कानानी ऐकून दुसऱ्या कानानी सोडून देत होता. आता राजा पण घरात आला होता. शिरप्याचा सासरा आणि मेहुणा त्याच्याकडे जरा अधाश्या सारखेच बघत होते. शिरप्या त्यांना थोडी तरी दारू देईल अशी त्यांची अपेक्षा होती, पण शिरप्यानी त्यांच्याकडे पूर्ण दुर्लक्ष केलं होतं.

"आज पाऊस जरा लैच लागलाय. हितं पाणी बी घरात यायला लागलं की." शिरप्याचा सासरा सांगत होता.

"व्हय तिकडं डोंगराकडल्या बाजूला लय पाऊस झालाय आन इंदिरानगरच्या हिथं बी पाणी जमलंय" राजानी त्याचीच री ओढली.

"आपल्याकडं काय नाय झालं म्हंजी बरं"

"काय न्हाय होत. तू झोप गुमान खाऊन" राजा उत्तरला.

"शिरप्या, तुझ्या गॅरेज मदी काय काम असेल तर बघ ना राजासाठी" शिरप्याची सासू आतूनच ओरडली.

"ए आई, म्या न्हाई त्या गॅरेज मदी काम करणार. त्ये लय वंगाळ हाये" राजा

"गप रे भाड्या, तुलाच काम नको करायला. म्या न्हाय करत का, त्यात काय वंगाळ?" शिरप्या.

इथेच शब्दाला शब्द लागायला सुरुवात झाली, आणि पाहता पाहता राजा आणि शिरप्या दोघेही एकमेकांवर हात उगारायची भाषा बोलू लागले. राजाचा मवालीपणा  आणि शिरप्याची मोसंबी आता बोलायला लागली होती. घरातल्या बाकीच्यांनी दोघांना थांबवायचा प्रयत्न केला, आणि थोडे फार यशस्वी पण झाले. पण बहुतेक सगळे राजाच्या बाजूनेच बोलत होते. राजाचे आई वडील आपल्या जावयाच्या बाजून बोलण्याची शक्यता नव्हतीच पण रखमानी सुद्धा आपल्या भावाचीच बाजू उचलून धरली. जशी जशी त्यांची भांडणं वाढत होती, तसाच त्या रात्री पाऊस सुद्धा वाढायला लागला होता. पुढच्या अर्ध्या तासात शिरप्यानी सासरच्या सगळयांची आई माई काढली होती. मनात असलेला राग आणि पोटात गेलेली दारू मनसोक्त बोलत होती.

भांडून भांडून दमल्यानंतर काही वेळाने ते भांडण आपसूकच मिटलं. सगळयांनी चार घास खाऊन घेतले आणि झोपायची तयारी सुरु केली. शिरप्याची सासू त्याच्यावर भलतीच चिडलेली.

"चल ग रखमे, आज आमच्या हित झोपायला."

"अशी कशी यील ती. माझी बायको हाय. ती हित्तंच झोपेल. म्या न्हाय धाडणार. ए रखमे, हित्तंच आडवी हो."

रखमेला काही बोलणं शक्यच नव्हतं. नवऱ्यानी सांगितलंय म्हटल्यावर तिने आई वडील आणि भावाला त्यांच्या घरी धाडलं. मंडळी त्यांच्या घरी गेली, म्हणजे पलीकडच्याच झोपडीत आणि रखमा आपल्या नवऱ्याच्या शेजारी येऊन झोपली.

इकडे रात्री पावसाचा जोर अजूनच वाढला होता.  रात्रीचा प्रहर जसा वाढत होता, तसा पावसाचा आवाज देखील. आजूबाजूच्या झोपड्यातून येणारे आवाज पण बंद झाले होते. इतक्यात कसलातरी जोरात आवाज झाला, शिरप्या आणि रखमा ताडकन उठून बसले. हा पावसाचा आवाज नव्हता. खूप मोठा आवाज होता, आणि तोही खूप जवळ. तेवढ्यात कोणाचे कोणाचे आवाज येऊ लागले आणि दोघांनीही झोपडी सोडली. बाहेर येऊन बघतात तर काय, शेजारच्या झोपडीवर भिंत कोसळली होती. रखमाच्या आई वडिलांची झोपडी त्या भिंतीखाली पूर्ण दबली गेली होती. सगळी माणसं झोपडी भोवती गोळा झालेली, आणि आतून ओरडण्याचे आवाज येत होते. रखमा आणि शिरप्या दोघेही धावले. जमेल तसं , शक्य होईल तितकं दोघांनीही आत जाण्याचा प्रयत्न केला पण त्यांना आत जाणं शक्य नव्हतं. शेजारच्या बिल्डिंगची भिंत

झोपडीवर पूर्णपणे कोसळली होती. त्यातच पावसाचा मारा सुद्धा वाढला होता. आता आतमधून येत असलेले आवाज हळू हळू क्षीण होऊ लागले होते, आणि काही वेळानी थांबले देखील.

कोणीतरी पोलिसांना फोन केला होता. पोलीस आले, पाठोपाठ अग्निशामक दलाचे जवान पण आले. त्यांनी झोपडीवर पडलेले दगड धोंडे उचलून मार्ग मोकळा करायला सुरुवात केली. भर पावसात सुद्धा पोलीस आणि जवान काम करत होते. इकडे रखमा एका कोपऱ्यात बसून मनसोक्त रडत होती. आई वडील आणि भावाचं काय झालं असेल ह्याची तिला कल्पना होतीच. पावसाच्या पाण्याबरोबर तिने डोळ्यातल्या पाण्याला वाट मोकळी करून दिली होती. शिरप्याला मात्र अजून काय करावं आणि काय नाही तेच समजत नव्हतं. तो मधूनच पोलिसांना मदत करायला जायचा, मध्येच बाजूला होऊन सगळा राडा बघत राहायचा. पोलिसांनी झोपडीवर पडलेले दगड उचलून आत प्रवेश केला तेंव्हा पहाटेचे चार वाजून गेले होते. थोड्याच वेळात घरातल्या तिघांचेही मृतदेह घेऊन पोलीस आणि अग्निशामक दलाचे जवान बाहेर आले. त्यांच्या शेजारी बसून रखमा धाय मोकलून रडत होती. तिचं सर्वस्व गेलं होतं. शिरप्या मात्र शांत होता. त्याला वाईट वाटत होतं, पण नको असलेली ब्याद गेली, एक कटकट संपली अशी एक भावना पण मनात होती.

थोड्याच वेळात तिथे राजकारणी लोकांचा वावर सुरु झाला. तसं पाहता एक झोपडी आणि एकच संसार मोडला होता. पण आता निवडणूका जवळ होत्या. त्यामुळे त्या मंडळींनी ह्या घटनेचा पुरेपूर वापर करायचं ठरवलं होतं. राजकारणी मंडळी, टीव्ही चॅनेल वाले आणि पेपरवाले ह्यांची वर्दळ सुरु झाली. कोणी कोणी शिरप्याची पण मुलाखत घेतली होती. शिरप्या आता टीव्हीवर दिसणार होता. दिवसभर नुसता धिंगाणा सुरु होता. संध्याकाळ झाली तशी बाकी सगळी क्रियाकर्म उरकून शिरप्या आणि मंडळी घरी आली. आता पाऊस पण बऱ्यापैकी थांबला होता. रखमा बरोबर दिवसभर शेजार पाजारच्या बायका होत्याच. त्यांनीच रखमा आणि शिरप्या ला रात्रीचं जेवण पण दिलं होतं. आणि तशातच टीव्हीवर बातमी आली की ह्या अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांना प्रत्येकी २ लाख रुपयांची मदत केली जाईल.

बातमी आली तशी शिरप्या थोडा हरखून गेला. प्रत्येकी २ लाख, म्हणजे आपल्याला ६ लाख मिळतील का काय? म्हटलं तर एका डोळ्यात दुःख आणि दुसऱ्या डोळ्यात पैसे दिसायला लागले होते. पण सरकारी काम आहे, काय कोणाला दीड दमडी पण मिळायची नाही अशी मनाची समजूत करून घेऊन शिरप्या गप्प बसला होता. रखमानी ती बातमी ऐकली होती पण तिचं सर्वस्वच गेलं होतं. त्यापुढे तिला पैशांचं काहीच दिसेना.

नवरात्रीचे दिवस होते. पाऊस संपून आता महिना उलटून गेलेला, आणि ह्या दुर्घटनेला २ महिन्या पेक्षा जास्त दिवस झालेले. आज शिरप्याच्या घरात बरेच दिवसांनी थोडा आनंद होता. शिरप्यानी नवीन रिक्षा घेतली होती, ते पण कोणतंही कर्ज न करता, कुठूनही पैसे न उचलता. शिवाय शेजारची झोपडी पण डागडुजी करून परत तयार केली होती. एक नवीन भाडेकरू तिथे घातला होता. दर महिन्याला त्या झोपडीचं दोन हजार रुपये भाडं शिरप्याला मिळणार होतं.  आपली स्वतःची झोपडी पण नीट करून घेतली होती. आणि सगळ्यात भारी म्हणजे आता त्यानी गॅरेज मध्ये पण पैसे गुंतवले होते. तो ज्या गॅरेज मध्ये काम करत होता, आता तो तिथला ५०% मालक झाला होता.

"शिरप्या, हे लई ब्येस झालं बघ. आता कसं घराला जरा चार पैसं दिसतील." शिरप्याचा मित्र पोप्या त्याला सांगत होता.

"हां र. त्ये हायेच. पर मला ना त्ये अर्धा मालक न्हाय व्हायचं. त्यात काय मजा? पूर्ण गॅरेज आपलं पायजे."

"मंग बघ की अजून कुठून २-३ लाखाची सोय होती का?"

"न्हाय रे, माझीच चूक झाली. त्या रात्री रखमाची आई तिला तिच्या घरी घेऊन जाणार व्हती. पर म्याच कावलेलो. म्या म्हटलं की माझी बायको हाय, ती हित्तेच झोपणार माझ्या शेजारी. ती इकडं झोपली, आन तिकडं ती भिंत...."

"आवं ... हिथं या जरा. हि थाळी उचला आन रिक्षाची पूजा करून घ्या." रखमानी आतून आवाज दिला.

शिरप्यापण काहीच न झाल्यासारखा उठला, पूजेची थाळी घेऊन रिक्षापाशी गेला. नवीन रिक्षा चकाचक दिसत होती, आणि खास करून मागच्या बाजूला लिहिलेले शब्द - 'आई वडिलांचा आशीर्वाद'.